प्रहार

# नाशिकमध्ये स्टार हेल्थचे पहिले विभागीय कार्यालय; महाराष्ट्रात ३.५ लाख जणांना विमा संरक्षण

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

आघाडीची आरोग्य विमा कंपनी स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने नाशिक येथे पहिले विभागीय (झोनल) कार्यालय सुरू केले. मुंबई नाका येथील श्री कालिका प्लाझामधील ५ हजार चौ. फूट क्षेत्रफळाच्या कार्यालयाचे उद्घाटन स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड विजय अरोरा यांच्या हस्ते झाले.

या कार्यालयात १५० हून अधिक व्यक्तींसाठी क्षमता असून ९,००० पेक्षा अधिक सल्लागारांसाठी प्रशिक्षण व परिषद सुविधा उपलब्ध आहेत. नाशिकमध्ये कंपनीची ४ कार्यालये, १ विमा केंद्र आणि ९ हजाराहून अधिक सल्लागारांचे नेटवर्क आहे. कंपनीचे पूर्णवेळ संचालक हिमांशु वालिया यांनी नाशिक हे वेगाने विकसित होणारे आरोग्य विमा बाजार असून झोनल कार्यालयामुळे ग्राहक, रुग्णालये व सल्लागारांशी अधिक प्रभावी संपर्क साधता येईल. महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कंपनीने ३.५ लाखांहून अधिक जणांना विमा संरक्षण दिले असून २,३०० कोटीपेक्षा अधिक मूल्याच्या दाव्यांचे निराकरण केले आहे. विजय अरोरा यांनी सांगितले की, नव्या कार्यालयामुळे नाशिक व आसपासच्या भागातील ग्राहक सेवा अधिक सक्षम होणार आहे.

